दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२९ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएचएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 29 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 263 | Pages 4 | Rate 4 Rs

## पेट्रोल-डिझेलनंतर आता CNG दरांचा भडका

**मुंबई**–देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे आधीच नागरिक त्रस्त असताना आता सीएनजीच्या दरवाढीने सर्वसामान्य वाहनधारकांची चिंता आणखी वाढली आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर वारंवार वाढल्यानंतर आता सीएनजीचे दरही भडकले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसह अनेक शहरांमध्ये सीएनजीच्या किंमतीत वाढ झाल्याने रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या मासिक बजेटवर मोठा परिणाम होणार असल्याचे चित्र आहे.पुण्यात एमएनजीएल कंपनीने सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपये ५० पैशांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा दर ९२ रुपये २५ पैशांवरून थेट ९४ रुपये ७५ पैशांवर पोहोचला आहे. वाढीव दर २७ मेच्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले. इनपुट गॅसचा खर्च वाढल्यामुळे ही दरवाढ करावी लागल्याचे स्पष्टीकरण कंपनीकडून देण्यात आले आहे.

# दिल्ली दौऱ्यात फडणवीसांची मोठी मोहीम

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट : कांदा-ऊस प्रश्नावर दिलासा शक्य; मांडल्या महत्त्वाच्या मागण्या

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित अनेक प्रकल्प, विविध अभियानं आणि राज्यासमोरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती स्वतः फडणवीस यांनी सोशल मीडियावरून दिली. गेल्या दोन दिवसांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महायुतीतील अनेक मंत्री दिल्लीत तळ ठोकून आहेत. त्यामुळे या बैठकींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झालं आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर एक्सवर पोस्ट करत या भेटीबाबत माहिती दिली. आमचे नेते आणि देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली येथे भेट घेतली. महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध विषयांवर त्यांचे मार्गदर्शन मिळाले. राज्यातील विविध प्रकल्प आणि अभियानांची माहितीही त्यांना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मार्गदर्शन नेहमीच सकारात्मक ऊर्जा देणारं असतं, असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या भेटीत केंद्र सरकारकडून महाराष्ट्रासाठी मोठ्या निर्णयांबाबत सकारात्मक संकेत मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.दरम्यान, राज्यात सध्या कांदा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. कांद्याच्या दरातील चढ-उतार, निर्यातबंदी आणि शेतकऱ्यांच्या नाराजीमुळे अनेक ठिकाणी आंदोलनं झाली आहेत. दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदारांमध्येही नाराजीचं वातावरण आहे. काही साखर कारखान्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांबाबत आक्षेप नोंदवले आहेत. त्यामुळे या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महायुती सरकारकडून दिल्ली पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं बोललं जात आहे.

काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीतील नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली होती. या बैठकीत कांदा आणि ऊस उत्पादकांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. कांद्याचा हमीभाव, निर्यातबंदी, ऊस दर आणि इतर कृषी विषयांवर केंद्र सरकारशी चर्चा करण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार, महाराष्ट्राच्या काही प्रमुख मागण्यांबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचं चित्र आहे. पुढील १० दिवसांत यासंदर्भात महत्त्वाच्या घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.राज्यात सध्या राजकीय वातावरणही चांगलंच तापलेलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती संवेदनशील बनली आहे. अशा वेळी राज्यातील तीनही प्रमुख नेत्यांचा दिल्ली दौरा आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांसोबतच्या बैठका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.



# प्रशासनाच्या ‘त्या’ निर्णयाविरोधात वाघोली ग्रामस्थ आक्रमक

## आज शेवगाव पंचायत समिती समोर सामूहिक मुंडण व जनआक्रोश आंदोलन!

दैनिक वादळ वार्ता

**शेवगाव । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५ - २६ च्या तालुकास्तरीय निकालात पारदर्शकता न राखता,जाणूनबुजून डावलल्याचा गंभीर आरोप करत आदर्श ग्रामपंचायत वाघोली ता. शेवगाव येथील सरपंच आणि समस्त ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात एल्गार पुकारला आहे.या अन्यायाचा निषेध नोंदवण्यासाठी आज शुक्रवार दिनांक २९ मे २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता शेवगाव पंचायत समिती कार्यालयासमोर सामूहिक मुंडण आणि जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबतचे अधिकृत निवेदन गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहे.

**’माझी वसुंधरा’ विजेता गाव ठरला डावललेला!**

’माझी वसुंधरा अभियान २.०/३.०’अंतर्गत प्रथम पुरस्कार प्राप्त असलेल्या आणि राज्य पातळीवर आदर्श काम केलेल्या वाघोली गावाचे काम उत्कृष्ट असूनही,तालुका स्तरीय निकालामध्ये प्रशासनाने हितसंबंध जपत वाघोली गावाला कुठलाही क्रमांक दिलेला नाही,असा थेट आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाने जाणीवपूर्वक आमच्या कामाचे खच्चीकरण करण्याचा आणि भविष्यातील वाटचालीला खिळ घालण्याचा प्रयत्न केला असल्याचा संताप ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.राज्य पातळीवर आदर्श ठरलेल्या आमच्या गावाला तालुका पातळीवरील निकालात जाणीवपूर्वक डावलून प्रशासनाने अन्याय केला आहे.हा अन्याय वाघोली चे ग्रामस्थ




कदापिही खपवून घेणार नाहीत. प्रशासनाच्या या भूमिकेचा निषेध म्हणून आम्ही सामूहिक मुंडण आंदोलन करत आहोत.

सौ.सुस्मिता उमेश भालसिंग लोकनियुक्त सरपंच,वाघोली

**अन्यथा सर्व जबाबदारी प्रशासनाची!**

या आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य ती कायदेशीर व पारदर्शक कार्यवाही करावी,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची आणि कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी पूर्णपणे प्रशासनावर राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती तहसीलदार शेवगाव, पोलीस निरीक्षक शेवगाव,मुख्य कार्यकारी अधिकारी,अहिल्यानगरआणि जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनाही पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.या आंदोलनात सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि शेकडो ग्रामस्थ सहभागी होणार असल्याचे समजते.

# पेट्रोल,डिझेल,रॉकेल,गॅस दरवाढ तात्काळ रद्द करा-वसंत मुंडे




दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



आरएसएसच्या विचार धारेचे भाजपचे केंद्र व राज्यातील त्रिमूर्ती सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे पेट्रोल,डिझेल,रॉकेल व घरगुती गॅसच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत असून इंधन टंचाई प्रचंड वाढलेली आहे.सर्व सामान्यनागरिक,शेतकरी,कामगार,विद्यार्थी व मध्यमवर्गीय जनतेचे जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. महागाईमुळे जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालाआहे.अन्यायकारक दरवाढीच्या निषेधार्थ राज्यभर काँग्रेसकार्यकर्ते आंदोलन करत आहेत. दरवाढ रद्द करण्याचे आदेश केंद्र व राज्य सरकारने तात्काळ काढावेत व सामान्य जनतेला न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे, सुरेश पाटील खेडे,प्रकाश जाधव कुंदा सोनवणे, शरद सोनवणे इत्यादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# निलेश सत्वधर हा ३३ वर्षीय तरुण दहा महिन्यापासून बेपत्ता

## केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील निलेश प्रभाकर सत्वधर,रा. केज.ता.केज.जि.बीड. वय ३३,वर्षे,रंग गोरा, नाक



सरळ, बांधा मजबूत, डोळे मोठे, उंची ५ फूट ७ इंच, अंगात आकाशी रंगाचे फूल बाहयाचे शर्ट, ग्रे कलरची पँट, पायात शुज दाढी मिशा ठेवतो, डोक्याचे केस काळे, अशावर्णनाचा मुलगा घरातून बाहेरून कटिंग करून येतो म्हणून कोणालाही न सांगता कोठेतरी निघून गेला असून तो दि,०८ जुन २०२५ पासून बेपत्ता आहे अशी तक्रार सुनिता प्रभाकर सत्वधर यांच्या तक्रारी वरुन केजपोलिस स्टेशनला मिसिंग कंप्लेंट दाखल केली असून सदरील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.१६७३ बाळासाहेब अहंकारे हे करत आहेत.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर जयंती साजरी



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.२८ मे २०२६ गुरुवार रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे शाळा व्यवस्थापनसमिती अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात व या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्म दि.२८ मे १८८३ रोजी महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला.वडील दामोदर सावरकर व आईचे नाव राधाबाई तसेच पत्नीचे नाव यमुनाबाई होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी,समाज सुधारक,मराठी कवी व मराठी लेखक होते.ते हिंदू तत्त्वज्ञ होते. पारतंत्र्यातील भारत देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी जिद्दीने व कसोशीने प्रयत्न केले.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात,सर्व सदस्य, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ ता.केज या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम, डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर, श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,श्रीमतीअंजली गोविंदराव उटीकर मॅडम, राहुल बजरंग बचुटे सर, आबासाहेब तुळशिराम धपाटे सर,पीएमओ पोषण शक्ती निर्माण योजना कामगार सौ.स्वर्णमाला पवार, सौ.अनिता पवार, विद्यार्थी व विद्यार्थीनी हे उपस्थित होते.शेवटी राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

# केज येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात;५० हून अधिक दात्यांचे रक्तदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

प्रजावत्सल आणि आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून केज शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून आयोजित केलेल्या या शिबिराला तरुण आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अत्यंत उत्साही वातावरणात हे शिबिर संपन्न झाले.जयंती उत्सवाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक ज्येष्ठ नागरिक आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अहिल्यादेवींच्या लोक कल्याणकारी कार्याचे आणि जलव्यवस्थापना तील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. केवळ पारंपारिक पद्धतीने जयंती साजरी न करता,समाजातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन या विधायक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उपस्थितांनी संयोजकांचे कौतुक केले.

सकाळ पासूनच शिबिराच्या ठिकाणी रक्तदानासाठी तरुणांनी मोठी गर्दी केली




होती. विशेष म्हणजे,यामध्ये पहिल्यांदाच रक्तदान करणाऱ्या नवोदित तरुण-तरुणींची संख्या लक्षणीय होती.यावेळी रक्तदान करून घेण्यात आले.या शिबिरात दिवसभरात एकूण ५० पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.सर्व रक्तदात्यांना संयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.शिबीर यशस्वी करण्यासाठी केज शहरातील विविध पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव समिती,शिव मल्हार प्रतिष्ठान मंडळांचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.या कौतुकास्पद उपक्रमामुळे केज परिसरामध्ये सर्वत्र समाजोपयोगी जयंती साजरी केल्याबद्दल आनंद व्यक्त होत आहे.

आदर्श रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर,रक्तपेढी प्रमुख डॉ.इलियाज पटेल पॅथॉलॉजी पर्यवेक्षक साक्षी बेलोरे,रोहन खरात,संध्या सुरवसे, आनंत सारूक,तसलीम काझी आदींनी रक्त संकलनाचे काम पूर्ण केले.रक्तदाते रंजना रोडे,

माऊली रोडे,कृष्णा रोडे, बाबुराव रोडे,राम डुकरे, अशोक निंगुळे,मनोज कदम,अरविंद बोबडे, भारत दांगट,माजी नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट,लक्ष्मण कोल्हे, कृष्णा गाढवे,निखिल काळे,गणेश कांदे, अतिश गाढवे,भागवत काळे,सुभाष निंगुळे, प्रतीक भोसले,आदित्य गायके,ईश्वर गायके, सुंदर रोडे,सागर माळी, दया भोसले,शैलेश भूतकर,केशव रोडे, अरबाज कुरेशी,सार्थक सुडके,संदीप जाधव, नगरसेवक बालाजी जाधव,रंजीत जाधव, सखाराम गायके,उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे, अभिजीत भालेकर, ओम मुळे महेश रोडे,प्रशांत गुंड ,मंगेश सातपुते,अभी गायकवाड ,रामदास डापकर,राम गाढवे, राजेश्वर रोडे आदी रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# संपादकीय

## मुंबई महापालिका नव्या उत्पन्नाच्या शोधात

मुबईकरांना नागरी सुख-सुविधा पुरवणारी मुंबई महानगरपालिका आता उत्पन्नाच्या बाबतीत पिछाडीवर पडत चालली आहे. जकात कर बंद झाल्यापासून पालिकेचे हक्काचे आणि सर्वात मोठे उत्पन्नाचे साधन बंद झाले आहे. सध्या केवळ मालमत्ता कर आणि पाणीपट्टी या दोनच मुख्य स्रोतांवर पालिकेचा गाडा सुरू आहे आणि त्यातूनच पालिका मुंबईकरांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आता याचाच एक भाग म्हणून पालिका आयुक्तांनी एक नवा आणि महत्त्वाकांक्षी प्रस्ताव तयार केला आहे. २०१७ पासून ओसाड पडलेल्या मुंबईच्या वेशीवरील जुन्या जकात नाक्यांच्या जागांचे रूपांतर अत्याधुनिक 'बस टर्मिनल' आणि 'पार्किंग हब'मध्ये करण्याची ही योजना आहे. मात्र, या योजनेतून पालिकेला अपेक्षित असलेले ध्येय खरोखरच साध्य होईल का? मुंबईकरांच्या थेट जिव्हाळ्याच्या असलेल्या याच विषयावर आणि प्रकल्पाच्या उद्देशावर प्रकाश टाकणारा हा विशेष प्रपंच.या योजनेअंतर्गत पालिका मानखुर्द जकात नाक्याच्या जागेवर आंतरराज्य बसेससाठी 'पार्किंग हब' साकारणार असून, त्यासाठी तब्बल १,५०० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. येथे प्रवाशांसाठी थ्री-स्टार हॉटेल्स आणि अत्याधुनिक पार्किंग सुविधा असतील. याच धर्तीवर दहिसर जकात नाक्यावरही थ्री-स्टार हॉटेल, दुचाकी, चारचाकी, बसेस आणि ट्रक्ससाठी पार्किंग हब उभारण्याचे काम सुरू झाले आहे. मुंबईत सध्या इतर राज्यांतून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसमुळे मुंबईकरांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. ही कोंडी फोडण्यासाठी इतर राज्यांतून व शहरांतून येणाऱ्या या बसेसना मुंबईच्या वेशीवर म्हणजेच दहिसर आणि मानखुर्द जकात नाक्यांवरच रोखण्यात येणार आहे. तिथून पुढे प्रवाशांना शहरात येण्यासाठी मेट्रो, बेस्ट बसेस आणि टॅक्सी यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय उपलब्ध करून दिले जातील. सध्या दहिसर जकात नाक्याची जागा १८,८६९ चौरस मीटर तर मानखुर्द जकात नाक्याची जागा २९,७७४ चौरस मीटर आहे. या दोन्ही मोक्याच्या जागा सध्या पालिकेच्या कोणत्याही उपयोगात येत नाहीत. त्यामुळे येथे पार्किंग हब उभारल्यास मुंबईतील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल आणि पालिकेलाही मोठा महसूल मिळेल, असा पालिकेचा दावा आहे.मात्र, यात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पालिकेचा उद्देश कितीही चांगला असला, तरी हा प्रकल्प प्रत्यक्षात यशस्वी करण्यासाठी अनेक मोठे अडथळे पार करावे लागणार आहेत. मुळात, आजघडीला दररोज सुमारे एक ते दीड हजार खासगी ट्रॅव्हल्स बसेस मुंबईत प्रवेश करतात. संध्याकाळी बाहेर पडताना या बसेस दादर, सायन, चेंबूर, ठाणे, वांद्रे, अंधेरी आणि बोरिवली यांसारख्या प्रमुख नाक्यांवर उभ्या राहून प्रचंड वाहतूक कोंडी करतात. या व्यवसायात मोठे आर्थिक व्यवहार गुंतलेले असल्याने वाहतूक पोलिसांकडूनही या बसेसवर ठोस कारवाई केली जात नाही, हे उघड गुपित आहे. या ट्रॅव्हल्समुळे मुंबईत जागोजागी ट्रॅव्हल्स एजंट्सचे पेव फुटले असून, भाड्याने दुकाने घेऊन किंवा इतर उद्योगांचे परवाने वापरून हे व्यवसाय बिनधास्तपणे थाटले जात आहेत. या संपूर्ण व्यवसायात कोणतेही नियम उरलेले नसून सर्व काही अनियंत्रितपणे सुरू आहे. या बसेस दिवसभर मुंबईतील वेगवेगळ्या रस्त्यांवर बेकायदेशीरपणे पार्क केल्या जातात. यापूर्वी वडाळा येथील 'ट्रक टर्मिनल' हे आंतरराज्य बस टर्मिनलसाठी राखीव ठेवण्यात आले होते, मात्र खासगी वाहतूकदारांनी त्यात रस न घेतल्यामुळे त्या चांगल्या योजनेचा पार बऱ्या वाजला. त्यामुळे पालिकेच्या या नव्या योजनेला तरी हे खासगी ट्रॅव्हल्स चालक कितपत प्रतिसाद देतील, याबाबत मोठी शंका आहे.याचे मुख्य कारण म्हणजे, आज खासगी वाहतूकदारांची एक अत्यंत बलाढ्य 'लॉबी' निर्माण झाली आहे, जी आपल्या सोयीनुसार कायदे आणि नियम वाकवून घेते. काही वर्षांपूर्वी मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी 'बाहेरून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसना सकाळी ८ नंतर मुंबईत प्रवेश दिला जाणार नाही', असा नियम करण्यात आला होता. मात्र, या वाहतूकदारांच्या लॉबीने थेट सरकार दरबारी वजन वापरून या प्रस्तावाला कडाडून विरोध केला, नियम वाकवला आणि आपली वाहतूक पूर्ववत सुरू करून घेतली. खासगी बसेसच्या करांमध्ये किंवा टोलमध्ये थोडी जरी वाढ केली, तरी ही लॉबी लगेच सक्रिय होते आणि सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करून घेते. वाहतूक विभागाने कोणताही कडक नियम लागू केला की, ही लॉबी थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत किंवा वरिष्ठांपर्यंत पोहोचते आणि तो नियम एका-दोन दिवसांत रद्द करून घेण्याची ताकद या वाहतूकदारांकडे आहे. त्यामुळे पालिकेच्या या नव्या प्रस्तावित प्रकल्पाला कितपत ठोस यश मिळेल, याविषयी शंका घेण्यास वाव आहे.आता या प्रकल्पाकडे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून पाहणेही गरजेचे आहे. जर या सर्व बसेस दहिसर किंवा मानखुर्द (वाशीजवळ) जकात नाक्यांवरच थांबवल्या, तर लांबचा प्रवास करून आलेल्या प्रवाशांना आपल्या कुटुंबासह आणि जड सामानसुमानांसह तिथे उतरावे लागेल. तिथून पुढे मुंबईतील आपल्या निश्चित स्थळी जाण्यासाठी दुसरा पर्याय शोधणे हा प्रवाशांसाठी एक मोठा 'द्रविडी प्राणायाम' ठरणार आहे. कारण, मुंबईतील सध्याची 'बेस्ट' सेवा किंवा मेट्रो-मोनोचे जाळे या प्रवाशांच्या ओझ्याला पूर्णपणे पूरक ठरू शकेल का, हा प्रश्नच आहे. राहता राहिला प्रश्न रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांचा; अशा मोक्याच्या ठिकाणी रिक्षा-टॅक्सीचालक प्रवाशांची मोठी आर्थिक अडवणूक करण्याची दाट शक्यता आहे. सध्या दादर, वांद्रे टर्मिनस किंवा लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला)सारख्या दूरच्या स्थानकांवर उतरून मुंबईत आपल्या घरी जाणे प्रवाशांना किती आर्थिक भुर्दंडाचे ठरते, हे आपण रोज पाहत आहोत. प्रशासनाने कितीही कडक नियम केले, तरी अशा ठिकाणी प्रवाशांची आर्थिक पिळवणूक होतेच, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

# पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेस पक्षाचे दादरमध्ये मोठे आंदोलन व रास्ता रोको

## पंतप्रधान मोदी पनौती तर मुख्यमंत्री फडणवीस खोटारडे, पेट्रोल डिझेल आहे तर पेट्रोल पंपावर रांगा कशासाठी आहेत? हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने पेट्रोल, डिझेल, LPG व सीएनजी मध्ये भरमसाठ दरवाढ करून सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. महागाईने पिचलेल्या जनतेला इंधन दरवाढ करून मोदी सरकारने महागाईच्या खाईत लोटले आहे. भाजपा सरकारने केलेल्या या महागाई विरोधात प्रदेश काँग्रेसचे अध्य हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वाखाली दादर येथील इंडिया बुल्स समोर आंदोलन केले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी रास्ता रोको करून लोकांना मेलोडी चॉकलेट वाटप केले तसेच नरेंद्र मोदी सरकार व फडणवीस सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पेट्रोल नाही, डिझेल नाही, सिलेंडर गायब आहे, इंधनाच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत, शेतमालाला भाव नाही, जनता हवालदिल आहे पण भाजपा सरकार मात्र मस्तीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशासाठी पनौती आहेत, ते सत्तेत आल्यापासून देशातील जनतेवर वरंवडा फिरवत आहेत. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे धादांत खोटे बोलत आहेत. पेट्रोल डिझेलचा मुबलक साठा आहे असे जर त्यांना वाटत असेल तर जनता भर दुपारी कडक उन्हात पेट्रोल पंपावर काय ऊन खायला रांगा लावत आहेत का, कोणी साठेबाजी केली असे त्यांना वाटत असेल तर कारवाई केली पाहिजे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.



# तोट्यातील एसटी विभागांना नफ्याकडे नेण्यासाठी व्यापक कृती आराखडा; प्रत्येक विभागासाठी 'पालक अधिकारी' नियुक्त होणार

## परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सातत्याने तोट्यात चालणाऱ्या विभागांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि नफ्यात आणण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, प्रत्येक तोट्यातील विभागासाठी प्रादेशिक व्यवस्थापक दर्जाच्या अथवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'पालक अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या मुख्यालयात बोलाविण्यात आलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियंका नारनवरे, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख यांच्या सह सर्व खाते प्रमुख व प्रादेशिक व्यवस्थापक उपस्थित होते.



एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर खर्च नियंत्रण, इंधन बचत, महसूल गळती रोखणे आणि प्रशासकीय शिस्त यांचा एकत्रित विचार करून ही कार्यपद्धती राबविण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालक अधिकाऱ्यांवर विभागाच्या आर्थिक प्रगतीची थेट जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे.

यानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित विभागाची आढावा बैठक घेण्यात येईल. या बैठकीत मागील महिन्याच्या उत्पन्न-खर्चाचा सखोल आढावा घेऊन चालू महिन्यासाठी ठोस नियोजन करण्यात येणार आहे. तसेच आगारनिहाय उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत.एसटीचे उत्पन्न वाढविण्यासोबतच खर्चात बचत करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. विशेषतः डिझेल बचतीसाठी प्रत्येक आगाराला जबाबदारी निश्चित करण्यात येणार असून, सातत्याने डिझेल बचत करणाऱ्या आगारांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना जाहीर करण्यात येणार आहे. इंधन बचत हीच एसटीसाठी अतिरिक्त उत्पन्न निर्मिती असल्याची भूमिका महामंडळाने स्पष्ट केली आहे. महसूल गळती रोखण्यासाठी सुरक्षा व दक्षता विभागालाही अधिक सक्रिय करण्यात येणार आहे. उत्पन्न बुडविणाऱ्या अथवा तिकिट व्यवहारात अनियमितता करणाऱ्या वाहकांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांच्यावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रवाशांचा महसूल हा एसटीचा कणा असून त्यामध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.अति कालीन भत्त्याच्या संदर्भातही कठोर आर्थिक शिस्त लागू करण्यात येणार असून, वित्त विभागाने निश्चित केलेल्या निकषांनुसारच अतिरिक्त काम व भत्त्यांना मंजुरी दिली जाणार आहे. अनावश्यक आर्थिक भार टाळण्यासाठी सर्व विभागांना दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.एसटीच्या मालमत्तांमधून अधिकाधिक महसूल मिळविण्यासाठी प्रत्येक बसस्थानकावरील व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात येणार आहे. सर्व दुकाने व आस्थापना कार्यरत असल्याची खात्री करून त्यांच्याकडून नियमित व योग्य भाडेवसुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रिक्त जागा तातडीने भाडेतत्त्वावर देऊन महसूल वाढविण्यावर भर राहणार आहे.तसेच प्रत्येक बसस्थानकावर सकाळच्या सत्रात 'इशू अँड स्टार्ट' उपक्रम काटेकोरपणे राबविण्यात येणार असून, बस सुटण्यापूर्वी प्रवाशांना तिकीट वितरणाची प्रक्रिया व्यवस्थित पार पडते की नाही यावर देखरेख ठेवली जाणार आहे.वाहकांचा इतर प्रशासकीय किंवा गैर-वाहतूक कामांसाठी होणारा वापर तातडीने थांबविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. वाहक हे एसटीच्या महसूल व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे घटक असून त्यांचा मूळ कामासाठीच प्रभावी उपयोग व्हावा, यावर महामंडळाचा भर राहणार आहे.एसटी ही केवळ परिवहन सेवा नसून महाराष्ट्रातील सामान्य जनतेची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे आर्थिक शिस्त, जबाबदारी आणि कार्यक्षम व्यवस्थापन यांच्या आधारे एसटीला सक्षम आणि स्वावलंबी बनविण्यासाठी सर्व स्तरांवर कठोर पण सकारात्मक पावले उचलली जातील, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# ब्रम्हाकुमारी केंद्राचा अध्यात्मिक शिक्षण प्रमाणपत्र वितरण समारंभ

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी येथील ब्रह्मकुमारी केंद्राने मंगळवारी एका भव्य आणि यशस्वी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन केले. आध्यात्मिक शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्याला विद्यार्थी आणि नागरिकांची लक्षणीय उपस्थिती लाभली.

हा कार्यक्रम मुंबईतील विक्रोळी (पूर्व) येथील कन्नमवार नगर क्र. १, बीएमसी शाळेजवळ, शांतीवन गार्डन येथे सकाळी १०:०० वाजता पार पडला. याप्रसंगी, समुपदेशन आणि मानसिक आरोग्य व मूल्य शिक्षण या अभ्यासक्रमांमधील प्रगत पदविका (advanced Diploma) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बी. के. वसंती दीदी (नाशिक उपविभाग प्रभारी) यांनी भूषवले.



प्रमुख पाहुण्यांमध्ये बी.के. नीलिमा दीदी (विक्रोळी केंद्र प्रमुख), बी.के. ज्योती दीदी (सहयोगी), विकास भाई (नाशिक नोडल अधिकारी), पंकज भाई (नाशिक नोडल केंद्र समन्वयक) आणि अमिता दीदी (सराव केंद्र संचालक, विक्रोळी) यांचा मंचावर समावेश होता. रेणू दीदी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे पद्धतशीर आणि आकर्षक पद्धतीने संचालन करून तो प्रभावीपणे पार पाडला.वक्त्यांनी मानसिक आरोग्य, व्यक्तिमत्व विकास आणि मूल्याधारित जीवनाचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रेरित केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमातून आध्यात्मिक जागृती, आंतरिक शांती आणि समाजात नैतिक मूल्यांच्या प्रसाराचा संदेश देण्यात आला. शांतीचा संदेश आणि आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नालेसफाईची कामे युध्दपातळीवर पूर्ण करावीत-सौरभ राव, आयुक्त

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे पूर्ण करत असताना कामाचा दर्जा, कामाची गती आणि वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, नालेसफाईची उर्वरित कामे ५ जूनपर्यत युध्दपातळीवर पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करुन आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ, यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याचे निर्देश आज झालेल्या बैठकीत आयुक्त सौरभ राव यांनी दिले. नालेसफाईच्या कामाचा प्रभाग समिती निहाय आढावा आयुक्तांनी घेतला. या बैठकीस उपायुक्त मधुकर बोडके, दीपक झिंजाड, डॉ. मिताली संचेती, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सर्व प्रभागसमितीचे सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता उपस्थित होते. ज्या ठिकाणी काम करताना अडचणी निर्माण होत असतील तर त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवावा, त्यांच्याकडून नालेसफाईबाबत ज्या सूचना येतील त्याची अंमलबजावणी करावी अशा सूचना सर्व सहायक आयुक्तांना दिल्या. तसेच ज्या ज्या ठिकाणी सखल भाग आहेत, जेथे दरवर्षी पाणी साचते, अशा ठिकाणी जवळपास १०२ पंप बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, अतिवृष्टीच्या काळात सखल भागात पाणी साचल्यास त्या ठिकाणी पंप ऑपरेटरची व्यवस्था करणे तसेच पंप बंद पडल्यास तात्काळ कार्यवाही होईल याबाबत नियोजन करावे, शहरातील संवेदनशील आणि पूरप्रवण ठिकाणी विशेष लक्ष ठेवून उपाययोजना राबविण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# 'लातूर पॅटर्न' बदनाम करण्याचे षड्यंत्र; उद्योग विभागाच्या तुघलकी नोटिसीची होळी करत काँग्रेस व कृती समितीचा एल्गार!

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । प्रतिनिधी**

नीट (NEET) पेपर फुटी प्रकरणाच्या नावाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या 'लातूर पॅटर्न'ला जाणीवपूर्वक टार्गेट केले जात असल्याचा आरोप करत आज लातूरमध्ये प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि 'लातूर पॅटर्न बचाव कृती समिती' यांच्या वतीने आज लातूर अर्बन बँक उद्योग भवन समोर प्रशासनाच्या जाचक नोटिसीचे जाहीर दहन करून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलकांनी लातूरच्या शैक्षणिक अस्मितेशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा थेट इशारा प्रशासनाला दिला.

लातूर येथील जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी २२ मे २०२६ रोजी एक वादग्रस्त नोटीस (जा.क्र.जिउकेला/सऔव/२०२६/८२१) जारी केली आहे. या आदेशान्वये, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट (औद्योगिक वसाहत) मधील मूळ कराराचा भंग करून उत्पादन व्यतिरिक्त सुरू असलेले सर्व पूरक व्यवसाय, जसे की ट्यूशन क्लासेस, कोचिंग क्लासेस, शिकवणी वर्ग, हॉस्टेल, खानावळ, वस्तीगृह आणि अभ्यासिका हे तातडीने आणि सरसकट बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फर्मानामुळे लातूरच्या ट्यूशन एरियात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**आमचे टॅलेंट जुने आहे, म्हणून लातूर पॅटर्न बावन्नकशी सोने आहे!**

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना प्रशासकीय कारवाईवर आणि भाजपवर घणाघाती आरोप केले. ते म्हणाले

मोठ्या कष्टाने आणि अनेकांच्या बलिदानातून 'लातूर पॅटर्न'चे हे बावन्नकशी सोने उभे राहिले आहे. हा पॅटर्न कोणाच्या उपकाराने नाही, तर जनमानसात रुजलेला आहे. आमचे टॅलेंट जुने आणि सिद्ध झालेले आहे, त्यामुळे ते कोणालाही बदनाम करता येणार नाही. या नीट पेपर फुटी प्रकरणाच्या आड लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे मोठे षड्यंत्र रचले जात आहे.

यावेळी अभय साळुंके यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, येत्या २१ जून रोजी विद्यार्थ्यांची महत्त्वाची परीक्षा आहे. आधीच विद्यार्थी आणि पालक प्रचंड मानसिक तणावाखाली आहेत.अशा ऐन परीक्षेच्या काळात तुम्ही थेट क्लासेस, हॉस्टेल्स आणि **अभ्यासिका बंद करण्याचे आदेश काढून विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडत आहात का?**



केवळ राजकीय आकसापोटी आणि कोणाच्या तरी सांगण्यावरून प्रशासनाने झोपेतून उठल्यासारखा हा तुघलकी अध्यादेश कसा काढला? इथे कायद्याचे राज्य आहे की हुकूमशाही? असा सवालही आंदोलकांनी केला.

अशाच प्रकारच्या अटक आणि गैरप्रकार पुण्यातही समोर आले आहेत. पण पुण्यात घटना घडली की ती 'त्या पर्टिक्युलर प्राध्यापकाची किंवा शिक्षकाची चूक' ठरते. मात्र लातूरमध्ये काही झाले की थेट संपूर्ण 'लातूर पॅटर्न'च चुकीचा, असा प्रचार केला जातो. हा दुजाभाव आणि मग्रुरी आम्ही कदापि सहन करणार नाही.

कृती समितीने स्पष्ट केले की, ते कोणत्याही गुन्हेगाराच्या पाठीशी उभे राहिलेले नाहीत. त्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले:

नीट पेपर फुटी प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील, मग ते डॉक्टर असोत, मोटेगावकर असोत किंवा पी. व्ही. कुलकर्णी असोत; चौकशीअंती ते दोषी सिद्ध झाल्यास त्यांना भरचौकात फाशी द्या! २३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या एकालाही सोडू नका, आमचा त्याला पाठिंबाच असेल.

परंतु, याच्या आडून ६३ च्या ६३ प्लॉट धारकांना सरसकट नोटीस देणे चुकीचे आहे. प्रशासनाने प्रत्येकाला वैयक्तिक सुनावणीची संधी द्यावी, त्यांची केस समजून घ्यावी आणि मगच कायदेशीर कारवाई करावी. असा हुकूमशाही पद्धतीने ट्यूशन एरिया बंद पाडण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र संघर्ष केला जाईल.

**अन् आंदोलकांनी पेटवून दिली नोटीस...**

उद्योग भवन परिसरात जमा झालेल्या शेकडो आंदोलकांनी आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आंदोलकांनी अधिकृत पत्राच्या प्रतींची होळी केली. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आंदोलनात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर स्नेहल उटगे,ड. किरण जाधव, विष्णुदास धायगुडे, प्रवीण सूर्यवंशी, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे,विजय जाधव, विकास कदम,संतोष शिंदे,पवार सर,पाटील कदम,मिरकले सर,पी. व्ही. विवेकानंद,संतोष धायगुडे ,चंद्रकांत बिडवे,बाळासाहेब कदम,पी. एस. जाधव तसेच लातूरमधील शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार पिढ्यांचा संगम; फटिंग परिवाराचे वंशवृक्ष स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**सालोड । प्रतिनिधी**



आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात नात्यांमधील आपुलकी कमी होत चालल्याची भावना अनेकदा व्यक्त केली जाते. एकाच कुटुंबातील सदस्यही कामाच्या व्यापामुळे एकमेकांपासून दुरावताना दिसतात. अशा काळात सालोड-हिरापूर येथील फटिंग परिवाराने चार पिढ्यांना एकत्र आणत कौटुंबिक एकतेचा आणि जिव्हाळ्याचा प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला.स्व. सीतारामजी गणाजी फटिंग यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित वंशवृक्ष स्नेहसंमेलन सोहळा सालोड-हिरापूर येथील संगम पॅलेस लॉन्समध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या आगळ्यावेगळ्या सोहळ्यात फटिंग परिवारातील मुलं, मुली, नातवंडे, जावई आणि विविध पिढ्यांतील १०० हून अधिक सदस्य मोठ्या आनंदाने सहभागी झाले होते.कार्यक्रमात जुन्या आठवणींना उजाळा देत परिवाराच्या वंशवृक्षाचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. एका मूळ वृक्षापासून विस्तारलेल्या विविध शाखांप्रमाणे परिवारातील पिढ्यांचा प्रवास, नात्यांची वीण आणि कौटुंबिक परंपरेची समृद्ध माहिती उपस्थितांसमोर मांडण्यात आली. या माध्यमातून नव्या पिढीला आपल्या पूर्वजांची ओळख आणि कुटुंबाच्या इतिहासाचा अभिमान अनुभवण्याची संधी मिळाली.यावेळी परिवाराच्या वंशवृक्षावर आधारित विशेष पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच परिवारातील ज्येष्ठ सदस्यांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सन्मानही करण्यात आला. कार्यक्रमात मनोरंजनात्मक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, संवाद सत्र आणि कौटुंबिक आठवणींनी भरलेले विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. शालेय स्नेहसंमेलनाच्या धर्तीवर आयोजित या कार्यक्रमाने उपस्थितांना बालपणातील आठवणींमध्ये पुन्हा एकदा रमवले.या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल नारायणराव फटिंग, देवराव तुकाराम फटिंग, हेमंत फटिंग तसेच समस्त फटिंग परिवाराने विशेष पुढाकार घेतला. संपूर्ण परिवाराला एका छताखाली आणत नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा आणि कौटुंबिक ऐक्य जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.स्नेह, आपुलकी, संस्कार आणि कौटुंबिक एकतेचे सुंदर दर्शन घडविणारा हा वंशवृक्ष स्नेहसंमेलन सोहळा उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला. बदलत्या काळातही नाती जपली गेली पाहिजेत, याची जाणीव करून देणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भद्रावती शहरात मोकाट कुत्र्यांचा हैदोस



**दैनिक वादळ वार्ता**
**भद्रावती । प्रतिनिधी**

नगर परिषद भद्रावती अंतर्गत येणाऱ्या सर्वच वॉर्डांत मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा हैदोस वाढीस लागला असून पाळीव जनावरांपासून ते लहान मुले व नागरिकांना चावे घेण्याच्या घटनेत वाढ होत आहे. दि.२५ रोज भद्रावती येथील गौतम नगर वॉर्डांत कुत्र्यांनी चक्क चार मुलांना चावा घेऊन जखमी केल्याचा प्रकार समोर आला. तद्वतच इतर वॉर्डात सुद्धा मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा हैदोस असल्याने जनजीवन भयभीत झाले आहे.कुत्र्यांनी चावा घेतलेल्या रुग्णांना स्थानिक ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता रेबीज लस व तत्सम औषधी नसल्याने जिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्याचा उपरोधिक सल्ला दिला जात आहे. स्थानिक नगर परिषदेने यावर उपाययोजना करून नागरिकांना सुरक्षितता द्यावी अशी मागणी शिवसेना तालुका प्रमुख तथा स्वीकृत नगरसेवक नरेंद्र पढाल , माजी नगराध्यक्ष तथा स्वीकृत नगरसेवक सुनील नामोजवार , नगरसेवक महेश जीवतोडे, उषा जाधव यांनी मुख्याधिकारी डॉ.विशाखा शेळकी यांना निवेदन सादर करून केली आहे.

# केंद्र व राज्य सरकारच्या हुकूमशाही विरोधात युवक काँग्रेसचा एल्गार धामणगाव रेल्वे येथे पेट्रोलियम मंत्र्यांचा पुतळा जाळून तीव्र आक्रोश!

**दैनिक वादळ वार्ता**
**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य सरकारच्या गलिच्छ, शेतकरी विरोधी आणि विद्यार्थी विरोधी धोरणांचा जाहीर धिक्कार करण्यासाठी आज धामणगाव रेल्वे येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व युवक काँग्रेसच्या वतीने 'भव्य न्याय आंदोलन' छेडण्यात आले. निघालेल्या या धडक मोर्चाने संपूर्ण धामणगाव रेल्वे शहर दणाणून सोडले.

सरकारच्या शेतकरी विरोधी आणि महागाई वाढवणाऱ्या धोरणांवर प्रचंड रोष व्यक्त करत, आंदोलकांनी भर चौकात केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या पुतळ्याचे जाहीर दहन केले. केंद्र सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पाय, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा गगनभेदी घोषणा देत कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर डोक्यावर घेतला होता. पुतळा दहनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे काही काळ वातावरणात प्रचंड तणाव निर्माण झाला होता.

या मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून झाली. हातात काँग्रेसचे झेंडे आणि सरकारच्या निषेधाचे फलक घेऊन हजारो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. हा जनसागर केंद्र व राज्य सरकारच्या जुलमी कारभाराचा निषेध करत शास्त्री चौक येथे पोहोचला, आंदोलनाचे नेतृत्व करणारे परीक्षित जगताप यांनी आपल्या भाषणातून सरकारवर अत्यंत बोचरी आणि धारदार टीका केली:

पेट्रोल-डिझेल आणि खतांची दरवाढ (शेतकऱ्यांची लूट): आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल स्वस्त असतानाही देशात पेट्रोल-डिझेलचे दर वाढवून सर्वसामान्यांचे कंबरडे तोडले जात आहे. रासायनिक खतांच्या किमती वाढवून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम हे सरकार करत आहे. हा अन्याय काँग्रेस कदापि सहन करणार नाही, असा इशारा देण्यात आला.

'नीट' (NEET) पेपर फुटीचा काळा बाजार: नीट पेपर फुटीच्या घोटाळ्यामुळे लाखो तरुण विद्यार्थ्यांचे




भविष्य या सरकारने अंधारात ढकलले आहे. हा केवळ पेपर फुटीचा प्रकार नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा खून आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत दोषींना जेलमध्ये टाकण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी हीच आमची मागणी: खोके सरकारच्या काळात शेतकरी आत्महत्या करत असताना सरकार मात्र मश्गूल आहे. शेतकऱ्यांना तात्काळ संपूर्ण कर्जमाफी मिळालीच पाहिजे, हा हक्क आम्ही हिसकावून घेतल्याशिवाय राहणार नाही, असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला.

**संपूर्ण काँग्रेस संघटना एकवटली!**

या आंदोलनात तालुका काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस कमिटी, महिला काँग्रेस, सेवादल आणि काँग्रेसच्या सर्व सेलचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच हजारो शेतकरी आणि तरुण बांधव रस्त्यावर उतरले होते.

हे सरकार फक्त आश्वासनांचे फुगे उडवणारे आणि सर्वसामान्यांना लुटणारे सरकार आहे. आज आम्ही पेट्रोलियम मंत्र्यांचा पुतळा जाळून फक्त इशारा दिला आहे, जर सरकारने पेट्रोल-डिझेलचे दर कमी केले नाहीत, नीट घोटाळ्यातील आरोपींना पाठीशी घालणे बंद केले नाही आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, तर यापुढे काँग्रेस पक्षाच्या वतीने याहूनही अधिक तीव्र आणि हिंसक आंदोलन छेडले जाईल यावेळी जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पंकज वानखडे, शहर काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष चंदू डहाणे, बंडूभाऊ जगताप, सचिदानंद काळे,युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष मयूर डुबे, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष आशिष शिंदे, अनुसूचित जाती सेलचे अध्यक्ष अजय तूपसुंदरे, शैलेश निस्ताने, राजूभाऊ भोगे,गजानन चवरे, समीर पाटील,नंदकुमार मानकर, सलीम पठाण, मुकेश राठी,मुकुंद माहोरे, मंगेश बोबडे, मनोज वेरुळकर, सुधीर शेळके,संदीप दावेदार, संजय शेंडे, संजय तायडे, मंगेश ढाले, संजय नन्नवरे, रमाकांत इंगोले, रुपेश गुल्हाने, अतुल वाघ, सुनील भोगे, संदीप भोगे, वैभव पावडे, निवृत्ती वैद्य, अनिस पठाण, गणेश धवणे, गिरीश गाडेकर, राहुल ठाकरे, अविनाश इंगळे, अविनाश दुधे, विजय माकोडे, वैभव पावडे, संजय इंगळे, डॉ प्रमोदराव रोंघे, नितीन देशमुख, अभिषेक खंडारे, बंडू मळापे,अनुप भोगे, अमोल भेंडे, अनुप मोहकार, संतोष पळसापूरे, महबूब भाई ठेकेदार, अर्जुन शिंदे, अक्षय मेश्राम, मुकेश गोफणे, गौरव जयस्वाल, सोनू शेख, नरेंद्र मस्के, राजकुमार माने, नरेंद्र बेराड, किशोर खुरपडे, संकेत उभाळ, विशाल बमनोटे, दामू चवरे, कैलास ऊईके, विशाल डुबे असंख्य कार्यकर्ते व शेतकरी बंधू उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षांतील गैरप्रकारांविरोधात अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद आक्रमक

## नीट पेपरफुटी, कोचिंग क्लासेसच्या मनमानीविरोधात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**अमरावती । प्रतिनिधी**



देशातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये होत असलेले गैरप्रकार, 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी आणि खासगी कोचिंग क्लासेसकडून होत असलेल्या कथित आर्थिक लूटमारविरोधात अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद आक्रमक झाली आहे. परिषदेच्या वतीने सोमवारी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन निषेध आंदोलन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेल्या गैरप्रकारांमुळे तरुणांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, नीट सह सर्व स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटी प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिषदेने केली. तसेच खासगी कोचिंग क्लासेससाठी शासनमान्य फी संरचना लागू करून संस्थांची नियमित तपासणी करावी, रखडलेल्या स्पर्धा परीक्षा तातडीने पारदर्शक पद्धतीने घ्याव्यात आणि परीक्षा प्रक्रियेत तांत्रिक सुरक्षा अधिक मजबूत करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.विद्यार्थ्यांच्या कष्ट आणि गुणवत्तेचा सन्मान राखण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा परिषदेच्या वतीने देण्यात आला.यावेळी गजानन मुदगल, प्रभाकर वानखडे, निलेश टवलारे, ज्योत्स्ना शेटे, नंदा राऊत, मयूर बासुंदे, प्रवीण मसराम, रोहन ढोमने यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व पदाधिकारी उपस्थित होते.

# नाशिक परिक्षेत्राचे नवनियुक्त विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येणपुरे यांचे नाशिक शहराच्या वतीने स्वागत

**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय क्रीडा विकास आणि पदोन्नती महामंडळाचे महासंचालक निलेश राणे यांनी नाशिक परिक्षेत्राचे नवनियुक्त विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येणपुरे (आयपीएस ) यांची सदिच्छा भेट घेत नाशिक शहराच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

या भेटीदरम्यान डॉ.निलेश राणे यांनी संजय येणपुरे यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्यात. तसेच विविध सामाजिक, प्रशासकीय आणि सुरक्षा विषयांवर दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली.यावेळी बोलताना डॉ.निलेश राणे यांनी संजय येणपुरे यांचे मार्गदर्शन, अनुभव आणि कार्यशैली नेहमीच प्रेरणादायी राहिली असल्याचे सांगितले. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत प्रशंसनीय असून त्यांच्या नेतृत्वातून प्रशासनाला अधिक बळ मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.दरम्यान या सदिच्छा भेटीची विविध स्तरांतून



चर्चा होत असून सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणी महसूल अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

## राहाता–कोपरगाव महसूल प्रशासनाविरोधात गंभीर आरोप; अन्यथा आत्मदहनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहाता आणि कोपरगाव तालुक्यात सुरू असलेल्या कथित अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी संबंधित महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्यात येईल, असा गंभीर इशारा सामाजिक कार्यकर्ते एन. डी. पवार यांनी दिला आहे. यासंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री तसेच विभागीय आयुक्त यांना पाठविण्यात आले असून प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

एन. डी. पवार यांनी दिलेल्या निवेदनात राहाता व कोपरगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतूक सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात त्यांनी ऑक्टोबर २०२५ पासून जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त तसेच संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी तक्रारी आणि पुरावे सादर केल्याचे नमूद केले आहे. मात्र, इतक्या पाठपुराव्यानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.निवेदनानुसार, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिल्यानंतर हे प्रकरण उपविभागीय अधिकारी आणि तहसील स्तरावर पाठविण्यात आले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल सादर केल्याचेही पवार यांनी नमूद केले आहे. मात्र, त्यानंतरही दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.याशिवाय काही महसूल अधिकारी पदाचा गैरवापर करून खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचाही गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, अव्वल कारकून आणि महसूल सहाय्यक यांच्यावर निलंबनाची तसेच विभागीय चौकशीची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी सुरू असताना त्यांना कोणत्याही प्रकारची पदोन्नती किंवा बदली देऊ नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, या आंदोलनाला काही पत्रकार संघटनांनीही पाठिंबा जाहीर केल्याचे पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले असून महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर नवे आव्हान उभे राहिले असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता या प्रकरणाकडे लागले आहे.




# मस्साजोगमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

## दीड महिन्यात दुसऱ्यांदा चोरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील मस्साजोग येथे अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, पाझर तलावातील मागील एक ते दीड महिन्याखाली चाळीस ते पन्नास शेतकऱ्यांचे वायर अज्ञात चोरट्यांने चोरी करून नेल्याच्या घटनेला विसर पडत नाही. तोपर्यंत चोरीची दुसरी घटना घडली आहे. दोन शेतकऱ्यांच्या विद्युत पंपासह वायर आणि चार ते पाच शेतकऱ्यांच्या मोटारीच्या वायरची अज्ञात चोरट्याने चोरी करण्याची घटना सोमवारी (दि. २५ ) मध्यरात्री घडली आहे.

घटना घडल्यानंतर सकाळी शेतकऱ्यांच्या निदर्शनास आली आहे. चोरीच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकऱ्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. व संतापाची लाट आणि भितीचे वातावरण पसरले आहे. अज्ञात चोरट्यांचा माग काढून लवकर



चोरट्यांना जेरबंद करण्यासाठी पोलिसांनी योग्य उपाययोजना करण्याची मागणी

येथील शेतकऱ्यांनी केली आहे. या चोरीच्या घटनेत सुदर्शन देशमुख, सुनील गायकवाड यांच्या पाच इंच एचपीचा पंप आणि २५० फूट वायर चोरून नेली आहे. मदन जिवनराव देशमुख यांच्या शेतातील २०० फूट वायर, तर फुलचंद दिंगाबर देशमुख २०० फूट वायर, परमेश्वर सदाशिव देशमुख २०० फूट वायर, प्रवीण प्रकाश देशमुख २०० फूट वायर मिळून एकूण १ हजार २५० फूट वायर आणि दोन विद्युत मोटारी चोरून नेल्या आहेत.

# पात्रुडमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी;सामाजिक ऐक्य व बंधुभावाचे पुन्हा दर्शन

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पात्रुड गावाने सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि परंपरेचा सुंदर वारसा कायम जपला असून बकरी ईदच्या निमित्ताने पुन्हा एकदा गावातील एकोप्याचे दर्शन घडले. पात्रुड येथील ईदगाह परिसरात हजारो मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात ईदची नमाज अदा केली.

विशेष म्हणजे, पात्रुड गावात सर्व धर्मीय नागरिक प्रत्येक सण एकोप्याने आणि आनंदात साजरा करत असल्याची परंपरा कायम आहे. याच सामाजिक सलोख्याचे दर्शन यावेळीही ईदच्या उत्सवात पाहायला मिळाले. नमाज पठणानंतर ईदगाह परिसरात मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश



दिला. तसेच सरपंच नौशाद लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, ग्राम विकास अधिकारी भागवत भुजबळ, कैलास आलझेंडे, बाळासाहेब बनकर आणि पत्रकार प्रकाश यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी गावातील सामाजिक सलोखा, परस्पर प्रेम आणि एकतेची परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले. सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन प्रत्येक सण उत्साहात साजरा करत असल्यामुळे पात्रुड गावाची ओळख आदर्श गाव म्हणून निर्माण होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# माजलगाव येथे बौध्द धम्म संस्कार शिबिराचे आयोजन बुध्द बांधवांनी लाभ घ्यावा–भिक्खु धम्मशिल थेरो

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील यशोधरा बुध्द विहार व प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने २ जुन ते १२ जुन या दहा दिवशीय येथील यशोधरा बुध्द विहार, फुले नगर येथे बौद्ध संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा लाभ बौद्ध बांधवांनी घ्यावा असे आवाहन संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो सह यशोधरा बुध्द विहाराचे बाबासाहेब जाधव, श्रीमती सुशीलाताई चांदमारे, एल आर मस्के, राजकुमार सोनवणे यांनी केले आहे.

या शिबिराला भिक्खु धम्मशिल थेरो व भिक्खु पय्यावर्धन हे मार्गदर्शन करणार असुन शिबीरात ध्यानसाधना, धम्म प्रवचन, पालीभाषा, धम्म प्रचार, प्रसार, धम्म संस्कार, व्यसनमुक्ती, उपोसथ, तसेच धम्म चर्चा सत्र, व धम्माच्या बाबतीत असलेले प्रश्नोत्तरे, होणार आहे. धम्मप्रचार, प्रचार साठी अशा बौद्ध धम्म शिबिराचे आयोजन होणे अत्यंत आवश्यक आहे या



शिबीराच्या माध्यमातून आपल्या येणाऱ्या तरुण पिढी धम्माचे सुसंस्कार पडणार आहेत आपल्या मुला , मुलींचे भावी जिवन हे उज्ज्वल व चांगले बनविण्यासाठी आपल्या मुला मुलींना या शिबिरात सहभागी करावे. आपल्याला जे बौध्द धम्म विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला आहे आपले कल्याण बौद्ध धम्मातच आहे तरी या शिबिरात बौद्ध उपासक उपासिकेने आपल्या पाल्याला सहभागी करून बौद्ध संस्कारचा लाभ घ्यावा असे आवाहन यशोधरा बुध्द विहार कमिटी व प्रियदर्शी संस्कार संस्था बीड यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेचे आयोजन अनेक विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

दैनिक वादळ वार्ता

**सेनगाव । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय बुद्धीबळ क्रीडा स्पर्धा सात वर्षाखालील मुले व मुली ३०/३१,मे पुणे येथे नऊ वर्षाखालील मुले व मुली ०२/०२/छत्रपती संभाजी नगर ११ वर्षाखालील मुले व मुली १३ वर्षाखालील मुले व मुली ०५ व ०७ जून सोलापूर येथे विविध गटाच्या स्पर्धा होणार आहे हिंगोली जिल्ह्याच्या संघ निवड चाचणी घेऊन हिंगोली जिल्ह्याचा संघ तयार करण्यात आला दि२४ मी २०२६ रविवार रोजी तालुका क्रीडा संकुलन हिंगोली येथे निवड चाचणी घेण्यात आली निवड चाचणीला प्रमुख उपस्थिती प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर व बुद्धिबळ संघटनेचे जिल्हा सचिव एम ए बारी उपस्थित होते व तसेच निवड चाचणी आयोजन शेख रहीम व प्रकाश अडकिने वसमत तसेच हिंगोली येथील बेले व बजरंग कदम संचालक ( शंभूराजे स्पोर्टस अकॅडमी



हिंगोली) यांनी सहकार्य केले व निवड चाचणीला पालक सुद्धा उपस्थित होते निवड चाचणीमध्ये जिल्ह्याचा संघ खालील प्रमाणे निवड करण्यात आली ७ वर्षा खालील मुली १) जुनेश फातिमा शेख मोहसीन मुले ९) वर्षाखालील मुले १) संभाजी शेळके २) हर्ष साबळे मुली १) संस्कृती सोळंके, अकरा वर्षाखालील वयोगट मुले १) कार्तिक बेले, देवांश चापके, श्रद्धा साबळे, १३ वर्ष वयोगटातील मुले, जय पवार, वेदांत कुंदर्गे, कुणाल शेळके, वेद देशपांडे, अहमद शेख मोहसीन, शिवराज सोळंके यांची निवड करण्यात आली खेळाडूंना प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर व जिल्हा सचिव एम ए बारी यांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी बॉक्सिंग संघटनेचे जिल्हा सचिव फिरोज पठाण व एकता फाउंडेशनचे संचालक गजानन आडे यांनी विजय झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात लोणी प्रथम, अंबोडा द्वितीय

दैनिक वादळ वार्ता

**आर्णी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय तपासणी पथकाने आर्णी तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींची सखोल तपासणी करून विविध विकासकामे व उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथील तपासणी पथकाने ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात आलेल्या योजनांचे मूल्यमापन केले.

या अभियानात ऑनलाइन गुणांकनानुसार आर्णी तालुक्यातील लोणी ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला असून अंबोडा ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. या यशामुळे तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतींच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी सरपंच, उपसरपंच, सदस्य, केंद्र चालक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या,




शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामस्तरीय अधिकारी–कर्मचारी तसेच ग्रामस्थांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. दरम्यान, जिल्ह्यातील अंतिम निवडीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व विशेष पथक पुन्हा भेट देणार असल्याची माहिती मिळाली असून, त्यासाठी ग्रामस्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आवश्यक तयारी सुरू केली आहे.

# साष्टे–कोलवडी,केसनंद–तळेरानवाडी–आव्हाळवाडी येथील शिवरस्ता खुला करण्याच्या हालचालींना वेग

दैनिक वादळ वार्ता

**फुलगाव । प्रतिनिधी**

पूर्व हवेली तालुक्यातील महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या साष्टे–कोलवडी–केसनंद–तळेरानवाडी–आव्हाळवाडी येथील शिवरस्ता खुला करण्याच्या प्रक्रियेला प्रशासनाच्या वतीने वेग आला असून,यासंदर्भात हवेली तालुक्याचे भूमी अभिलेख खात्याचे उपअधीक्षक कार्यालयाकडून नोटीस जारी करण्यात आली आहे.अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे,कोलवडी–साष्टे ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड यांनी दिली.हवेलीचे भूमी अभिलेखचे उपअधीक्षक यांनी लोणी काळभोरचे अपर तहसीलदार यांना पाठविलेल्या पत्रानुसार,साष्टे–कोलवडी,केसनंद–तळेरानवाडी–आव्हाळवाडी हा शिवरस्ता खुला करण्याची कार्यवाही दिनांक ३ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येणार आहे.यावेळी संबंधित गावचे मंडळ अधिकारी,ग्रामसेवक अधिकारी,ग्रामपंचायत प्रतिनिधी तसेच शिवरस्ता लगतचे शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत.

लोणी काळभोर तहसील कार्यालय यांच्या आदेशानुसार ही कार्यवाही राबविण्यात येत असून,शिवरस्ता खुला करण्यासाठी आवश्यक सूचना व समन्वय साधण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.सदर रस्ता खुला झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून,शेतीमाल वाहतूक,शेतात ये–जा तसेच कृषी कामांसाठी मोठी सोय निर्माण होणार आहे.अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मार्गाच्या प्रश्नामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.मात्र आता प्रशासनाच्या पुढाकारामुळे हा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली



आहे.

तसेच या शिवरस्ता खुला करण्याच्या कामामध्ये जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे,सुरेखा रमेश हरगुडे,कोलवडी–साष्टे गावचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड,केसनंदचे प्रशासक सरपंच सरपंच विशाल हरगुडे, यांचे मोलाचे योगदान असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केल्याचे नागरिकांनी सांगितले.

आव्हाळवाडी – मांजरी खुर्द – तळेरानवाडी – कोलवडी – साष्टे – वाडेबोल्हाई हा शिवरस्ता लवकरात लवकर खुला करण्यात यावा याबाबतचे निवेदन अपर तहसीलदार तृप्ती कोलते यांना जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे,सुरेखा रमेश हरगुडे,कोलवडी–साष्टे गावचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड,केसनंदचे प्रशासक सरपंच सरपंच विशाल हरगुडे यांच्या वतीने देण्यात आले आहे.

या निर्णयामुळे ग्रामस्थ व शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून,लवकरात लवकर रस्ता खुला व्हावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आमदार पठारे,आमदार कटके यांचे विशेष योगदानाचे कौतुक –

यासोबतच वडगाव शेरी विधानसभा मतदार संघाचे आमदार बापूसाहेब पठारे,शिरूर–हवेली विधानसभा मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांचे देखील या कामासाठी विशेष योगदान लाभल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.त्यांच्या मार्गदर्शन व पाठपुराव्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा शिवरस्ता महत्वाचं ठरणार – विशेष म्हणजे,हा शिव रस्ता भविष्यात वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने देखील महत्त्वाचा ठरू शकतो.तळेराणवाडी मार्गे थेट खराडी बायपासला जोडणी उपलब्ध झाल्यास वाघोली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे.त्यामुळे या रस्त्याकडे केवळ शेतकऱ्यांच्या दृष्टीनेच नव्हे तर वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या पर्यायी मार्गाच्या स्वरूपात पाहिले जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077